

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine **April 2024** - Pages - 52

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे  कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ६ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




संस्थेच्या हितचिंतक व देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर आणि श्रीमती सिंधुताई धामणकर
या भगिनींनी संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर विश्वास दर्शवून,
नाशिक येथील आपला राहता बंगला दि. २७ मार्च २०२४ रोजी संस्थेस देणगी दिला,
याप्रसंगी संस्थेच्यावतीने पदाधिकारी व संचालक यांनी
पुष्पगुच्छ देऊन धामणकर भगिनींचे आभार मानले.

## ✻ महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ३० ✻



दि. १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र विद्यालयाच्या १०३ व्या वर्धापनदिन प्रसंगी महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमा पूजन प्रसंगी उपस्थित कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. अमोल जोशी यांच्या समवेत डावीकडून मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे, अध्यापक श्री. मल्लिनाथ वाघमोडे, प्राचार्य वि. पां. गावडे, अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते आणि श्री. रमेश चौधरी



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संचालक श्री. अमोल जोशी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी





→ वार्षिक क्रीडा स्पर्धा आणि बौध्दिक स्पर्धांमधे यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके देताना संचालक श्री. अमोल जोशी आणि कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी

संपादकीय

# 'क्षणभर विश्रांती'

'चला सुट्टी झाली, आता खूप खूप खेळायचे'. या मंत्रजागरातच एप्रिल महिना उजाडतो.

साधारणतः मार्च महिन्यात किंवा त्या पुढच्या एप्रिलपर्यंत जवळ जवळ सगळ्याच विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा आटोपतात. किंबहुना ज्या कोणा विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपायच्या असतात त्यांनासुध्दा सुट्ट्यांचेच वेध लागलेले असतात. सुट्टी या शब्दातच काहीतरी जादू दडलेली आहे. त्या जादूची मोहिनी किंवा गारूड आबालवृद्धांच्या मनावर असतेच असते. कदाचित् 'बालपणीचा काळ सुखाचा' असल्याने आणि त्या वयात आपल्यापेक्षा आपली काळजी घेणारे इतरेजन अधिक प्रमाणात असल्याने, बालपणी मिळणाऱ्या सुट्टीचा आनंद जास्त प्रमाणात उपभोगता येतो.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुट्टी म्हणजे एक पर्वणीच असते. सुट्टी म्हणजे आनंद आणि मजा. खाणे पिणे, खेळणे आणि झोपणे अशा भरगच्च कार्यक्रमात वेळ कसा भुर्रकन् उडून जातो कळतच नाही. सुखाचे सोनेरी दिवस फुलपाखराच्या गतीने उडत उडतच जातात. जेवणापुरता घरी मुक्काम टाकून बाकी सारा वेळ हुंदडण्यात कसा जातो ते कळतच नाही. दुपारी उन्हात खेळू नका, ओरडू नका, आवाज करू नका अशा धमकावण्यांकडे काणाडोळा करत खेळ आणि दंगा अतिशय सुव्यवस्थितपणे सुरू असतो. त्याचबरोबर कुठल्या झाडावर कैऱ्या, जांभळं आदी फळं आहेत याचाही मागोवा मोठ्या चतुराईने, गुप्ततेने आणि सफाईदारपणे घेतला जातो. मुलांच्या अंगचे बातम्या काढायचे हे उपजत कौशल्य पाहून त्या कौशल्याला जर, चांगले वळण लावले तर, पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागाला मोठीच मदत मिळेल असे मला वाटते.

माझ्या विद्यार्थी मित्रांनो, तुम्ही सुट्टीचा आनंद जरूर उपभोगा पण, त्याचबरोबर तो आनंद हिंसक किंवा बेताल नसावा याची जरूर काळजी घ्या. दिवसाचे चोवीस तास रिकामे असल्याने ते व्यर्थ खर्ची घालू नका. उगीचच वेडे साहस करू नका. उंच उंच झाडांवर चढणे, उंचावरून उड्या मारणे, अनोळखी पाण्यात उतरणे, निष्कारण धडपडणे आदी स्वतःला व आपल्या परिवाराला संकटात घालणाऱ्या दुःसाहसी गोष्टी करू नका. या रिकाम्या वेळात तुम्ही ज्या शहरात किंवा गावात रहात असाल तिथल्या परिसराची डोळसपणे माहिती करून घ्या. प्रत्येक शहराला एक परंपरा असते. रोजच्या धकाधकीच्या आणि चाकोरीबध्द जीवनक्रमात आपल्या परिसरातील त्या वारसास्थळांकडे आपले पूर्णतः दुर्लक्ष होत असते. सुट्टीच्या काळात त्या ऐतिहासिक स्थळांची नीट माहिती करून घ्या आणि मग पहा, तुमच्या शहराची तुम्हाला कशी नव्याने ओळख होते.

ऐतिहासिक वास्तूंबरोबरच तुम्ही तुमच्या परिसरातील निसर्गाचा अभ्यास करा. निसर्गातील कलाकृती मग ती अणूएवढी असो वा आकाशाएवढी असो प्रत्येकात विविधता असते. अस्सलता असते आणि विशेष म्हणजे प्रत्येकात चैतन्य असते. त्या चैतन्याशी आपले नाते जोडा.

अगदी तुमच्या परिसरातील रस्त्यावरच्या वृक्षवेलींबद्दल माहिती गोळा करा. त्या वृक्षसृष्टीचा अभ्यास करा. त्या वनस्पती सृष्टीच्या निरीक्षणातून तुम्हाला भरपूर मनोरंजनात्मक माहिती आणि ज्ञानप्राप्ती होईल. तुमची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी अधिकाधिक समृध्द होत जाईल.

वृक्षसृष्टीचे अवलोकन करताना तुमच्या लक्षात येईल की, निसर्गाने किती प्रकारचा अमौलिक खजिना तुमच्यापुढे खुला केला आहे. एक झाड दुसऱ्या झाडासारखे नसते. एवढेच काय पण, एकाच झाडाची पाने, फुले आणि फळातही मोठी विविधता असते. वृक्षसृष्टी आपल्याला सदैव दुसऱ्यासाठी जगण्याचा संदेश देत असते. झाडाची फळे, फुले आणि सौंदर्य झाड स्वतः कधीच उपभोगत नाही. स्वतः उन्हातान्हात, पावसापाण्यात उभे राहून झाडे येणाऱ्या जाणाऱ्या पांथस्थावर आत्मीयतेने पखरण घालण्यात धन्यता मानतात, त्याचबरोबर

**'बीज मोडे, झाड होये,**
**झाड मोडे, बिजी समाये.'**

या जीवन प्रक्रियेतून सृष्टीतील अमरतेचा प्रत्ययच झाडे आपल्याला देतात.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळेस आकाशात उषेनिशेच्या रंगमहालांचे वैभव पाहताना मन थक्क होते. तुमच्या गावात जर, नदी किंवा समुद्र असेल तर, त्या नदीप्रवाहाचे किंवा जलसाठ्याचे बदलणारे रूपवैभव न्याहाळा. आकाशाला भिडणाऱ्या पर्वत शिखराकडे, त्यावर एकाकीपणे उभ्या असलेल्या झाडांकडे पहा. त्यांची सातत्याने बदलणारी रूपे, त्यावर असलेली प्राणीसृष्टी तुम्हाला खूप काहीतरी देऊन जात असते. तुमच्या घराजवळ बागडणाऱ्या प्राण्यांकडे, पशुपक्ष्यांकडे पहा. त्यांच्या लकबी न्याहाळा. त्यांची भाषा ऐका. त्यातून सृष्टीचे एक वेगळेच गारूड आपल्याला जाणवते.

निसर्गाचे हे क्षणोक्षणी बदलत जाणारे रूप अनुभवताना आपल्याही मनावर कळत न कळतपणे त्या निसर्गाच्या सत्य, शिव आणि सौंदर्य रूपाचा संस्कार होतो. म्हणूनच आधुनिक काळातले संत श्रेष्ठ गाडगेबाबा म्हणतात की, प्रत्येकाने 'आकाशाचे आणि पृथ्वीचे पुस्तक वाचायला शिकले पाहिजे.' सृष्टी तुमच्यापुढे हातचे राखून न ठेवता आपले सारे वैभव मुक्तहस्ताने उधळत असते. त्या विविध रूपचित्रांनी आपलेही जीवन अधिकाधिक समृध्द होत असते, होत जाते.

म्हणूनच तुमच्या सुट्टीची मजा उपभोगताना मी सांगितलेल्या गोष्टीही करून पहा. मला खात्री आहे निसर्गाच्या या अभ्यासाने माणूस आणि त्याचे जीवन समजायला तुम्हाला मदत होईल आणि परिपूर्ण माणूस घडवणे हे शालेय शिक्षणाचे ध्येयही साकार होईल.

दि. २५ मार्च २०२४
धूलिवंदन

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## शैक्षणिक सहल

महाविद्यालयाची शैक्षणिक सहल शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी रांजणगाव गणपती, टाकळीहाजी, ता. शिरूर, पुणे व निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर या दोन गावांच्या सीमेवर असलेल्या मळगंगा नदीतील निसर्गचमत्कार असलेल्या रांजणखळगे व लोहगाव, जि. पुणे येथील डायमंड वॉटर पार्क येथे काढण्यात आली होती.

प्रथम रांजणगावच्या गणपतीच्या दर्शनाने सहलीचा आरंभ करण्यात आला. या गणपती मंदिरात विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष पठण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना रांजणखळगे दाखवण्यात आले. तसेच या ठिकाणी असलेले मळगंगा देवीचे दर्शन विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि सेवकांनी घेतले. रांजणखळगे पाहिल्यानंतर अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी या रांजणखळग्यासंबंधी भौगोलिक माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यानंतर डायमंड वॉटर पार्क येथे विद्यार्थ्यांना नेण्यात आले. या वॉटर पार्कमध्ये पोहण्याचा व वेगवेगळे साहसी खेळ खेळण्याचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला.

या शैक्षणिक सहलीचे नियोजन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले होते. या सहलीमध्ये प्रशालेतील इ. ५ वी ते ९ वी चे १७६ विद्यार्थी १४ शिक्षक, श्री. देविदास काळे व श्री. संदीप रंदवे हे सेवक उपस्थित होते. या शैक्षणिक सहलीस एस. टी. महामंडळाने ४ बसेस् उपलब्ध करून दिल्या होत्या. या सर्वांना रांजणखळगे या भेटीस जाताना वाटेवर असलेल्या हॉटेल जनसेवा या ठिकाणी सकाळी वडापाव देण्यात आला. नंतर दुपारचे जेवण डायमंड वॉटर पार्क येथे देण्यात आले. तसेच प्रवासात केळी, भेळ, पारले बिस्कीटचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

## विद्यालयाचा १०३ वा वर्धापन दिन साजरा

शनिवार दि. १६ मार्च २०२४ रोजी विद्यालयाचा १०३ वा वर्धापन दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे संचालक श्री. अमोल जोशी हे होते. या कार्यक्रमाच्या आरंभी कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब यांच्या पुतळ्यास संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर संचालक श्री. अमोल जोशी, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, प्राचार्य वि. पां. गावडे, शिशुनिकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संचालक श्री. अमोल जोशी आणि कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक गुरुवर्य कै. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर व कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी करुन दिला. संचालक श्री. अमोल जोशी यांचा सत्कार कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी व मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांचा सत्कार प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला. या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक श्री. अमोल जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी वार्षिक क्रीडा स्पर्धा व बौद्धिक स्पर्धेत यशस्वी झालेल्या प्रशालेतली विद्यार्थ्यांना सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली. वार्षिक क्रीडा स्पर्धा व बौद्धिक स्पर्धा पारितोषिक यादीचे वाचन माध्यमिक विभागाच्या अध्यापिका सौ. सुनंदा भाईक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. अपर्णा भरगुडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर

दाते यांनी केले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी सुदंर रांगोळी बी. एड. छात्र अध्यापक श्री. आकाश आगळे व त्यांचे सहकारी मित्र यांनी काढली. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. कार्यक्रम पत्रिका अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी तयार केली. या प्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ***

## कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

यंत्र विभागामध्ये २६ फेब्रुवारी ते १मार्च २०२४ या काळात, तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता 'Spoken Tutorial', 'python3.4.3' या विषयाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी पूर्व-रेकॉर्ड केलेले व्हिडिओ ऐकले. यासाठी प्रा. रश्मी पाकणकर यांनी मार्गदर्शन केले आणि प्रा. सी. आर. मोरे व प्रा. एम. एम. कांबळे यांनी सहकार्य केले.

यंत्र विभागामध्ये २० फेब्रुवारी २०२४ रोजी श्री. झियाद हाचाचे, Dassault France Industry Process Expert, श्री. रजित सयाल, Academia buisness lead, श्री. आशिष कुलकर्णी, Senior Manager, श्री. विक्रम जाधव, आयएफएस अकॅडमी, या मान्यवरांनी पी. आय. आणि रोबोटिक्स प्रयोगशाळेला भेट दिली. याप्रसंगी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे व विभागप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर उपस्थित होते. श्री. झियाद यांनी 'थ्रीडी एक्सपिरियंस प्लॅटफॉर्म'वर उपलब्ध असलेल्या कोर्सेस विशेषतः रोबोटिक्सवर सविस्तर सादरीकरण केले.

**लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद**

महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभाग आणि सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्या शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ८ आणि ९ मार्च २०२४ रोजी लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत विविध देशांतून २४ शोधनिबंध सादर करण्यात आले. डॉ. एम. एस. सुतावणे, संचालक भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था अलाहाबाद आणि डॉ. सुरेश गोसावी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी उद्‌घाटनपर भाषणात मार्गदर्शन केले. या परिषदेत डॉ. भावना जोशी, डॉ. भारती हरिशंकर, डॉ. स्मिता चाकोते, डॉ. उमा मुदेनगुडी, डॉ. आदिती सिंघल, समृद्धी इनामदार, वैष्णवी भोसले रेडेकर यांची प्रमुख भाषणे झाली. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. महेश पोतदार व प्रा. निलेश कुचेकर यांनी काम पाहिले. कार्यशाळेच्या निमंत्रक म्हणून डॉ. कल्याणी कुलकर्णी सहनिमंत्रक म्हणून डॉ. गीता शिंदे यांनी काम पाहिले.

**एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन**

इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागाने दि. १ मार्च २०२४ रोजी तृतीय वर्षाच्या डिजिटल इमेज प्रोसेसिंगच्या निवडक विद्यार्थ्यांसाठी 'MATLAB APP डिझायनरवर GUI अंमलबजावणी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस ३४ विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. पी. जी. शेटे, प्रा. एम. पी. पोतदार, प्रा. एन. डी. चौधरी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. ई अँड टीसी विभागाच्या प्रमुख डॉ. कल्याणी कुलकर्णी यांनी कार्यशाळेच्या आयोजनासाठी मार्गदर्शन केले. ***

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

## अतिथी व्याख्यान

✲ संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. शैलेश धर्माधिकारी यांनी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'करियर अपॉर्च्युनिटीज इन प्रिंटिंग अँड पॅकेजिंग' या विषयावर विद्यार्थ्यांशी ऑनलाईन पध्दतीने संवाद साधला. प्रिंटिंग अँड पॅकेजिंग क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेल्या विविध संधी तसेच कंपनीची निवड करताना विद्यार्थ्यांनी कोणत्या गोष्टींचा विचार करावा, पदविका अभ्यासक्रमानंतर उपलब्ध असलेल्या संधी तसेच मुद्रण अभियांत्रिकीनंतर उपलब्ध असलेल्या संधी इ. विषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

✲ श्री संत सेवा संघाचे श्री. चेतन भोसले यांनी 'फोकस व सेल्फ कंट्रोल' या विषयावर प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराज व इतर राष्ट्र पुरुषांच्या जीवन चरित्रामधून फोकस व सेल्फ कंट्रोल हा विषय त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

✲ श्री संत सेवा संघाचे श्री. मंगेश पडवळ यांनी 'इंम्पॉर्टन्स ऑफ टिम वर्क व लिडरशिप' या विषयांवर प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराज, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि इतर राष्ट्र पुरुषांची उदाहरणे देऊन टिम वर्क व लिडरशिप हा विषय विद्यार्थ्यांना समजावून सांगितला.

## विभागीय क्रीडा स्पर्धा

आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांनी व्हॉलीबॉल व कबड्डी या क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेतला. प्रा. शंकर शेळकंदे, श्री. विष्णू बोत्रे व श्री. सागर बंडगर यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## PAMEX 2024

बॉम्बे एक्झिबिशन सेंटर गोरेगाव, मुंबई येथे आयोजित PAMEX 2024 या प्रदर्शनामध्ये संस्थेला स्टॉल उपलब्ध झाला होता. या स्टॉलद्वारे मुद्रण क्षेत्रातील विविध अभ्यासक्रमांची माहिती, प्रवेश प्रक्रिया इ. विषयी माहिती संस्थेतील सेवकांनी दिली.

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS)

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत श्री संत सेवा संघ, उंबरे, ता. भोर, जि. पुणे येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ग्राम स्वच्छता, प्लॅस्टिक संकलन, योगा इ. उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रा. अक्षय रावेतकर, प्रा. शंकर शेळकंदे व प्रा. राजेश जाधव यांनी या शिबिराचे संयोजन केले.

## ग्रीन क्लब

ग्रीन क्लब उपक्रमांतर्गत श्री क्षेत्र बनेश्वर येथे प्रथम वर्षातील २५ विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण, प्लॅस्टिकचे संकलन, पाणी बचत इ. मध्ये सहभाग घेतला होता.

## औद्योगिक भेटी

कदम डिजिटल ट्रान्स प्रिंट्स, पुणे येथे द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. डिजिटल प्रिंटिंग मधील आधुनिक यंत्र सामुग्री तसेच प्रिंटिंग सॉफ्टवेअर इ. बाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळाली. प्रा. राजेश जाधव व श्री. सागर बंडगर यांनी या औद्योगिक भेटीचे संयोजन केले.

## स्क्रीन सेट, पुणे

प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्क्रीन सेट, पुणे या कंपनीस भेट दिली. स्क्रीन मेकींग, स्क्रीन प्रिंटिंग मशीन संशोधन आणि विकास इ. विषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती मिळाली. प्रा. सौ. नेहा कुलकर्णी व श्री. राजाराम गभाले यांनी या औद्योगिक भेटीचे संयोजन केले.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थी कु. पार्थ फडतरे आणि कु. विक्रांत माने, प्रथम वर्ष यांनी तसेच कु. रुपाली गाडेकर, द्वितीय वर्ष यांनी आपले

मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी प्रा. सौ. नेहा कुलकर्णी व प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### जागतिक मुद्रण दिन

जागतिक मुद्रण दिनानिमित्त श्री. प्रशांत सरदेशमुख, संचालक स्क्रीन सेट, पुणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी स्क्रीन प्रिंटिंगचे विविध उपयोग, स्क्रीन प्रिंटिंग मधील विविध संधी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी कु. अक्षद दरबार याने विद्यार्थ्यांना जागतिक मुद्रण दिनाविषयी माहिती दिली. प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. सौ. नेहा कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

### अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संस्थेस भेट

अभिनव कला महाविद्यालयातील द्वितीय वर्षातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी संस्थेस भेट दिली. या विद्यार्थ्यांना प्रिंटिंग टेक्नॉलॉजी या विषयी माहिती हवी होती. त्यांनी संस्थेतील विविध विभागांना भेट दिली. या विद्यार्थ्यांना प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे, प्रा. रोशन चौधरी व प्रा. सौ. नेहा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

### स्कूल कनेक्ट

मुक्तागंण इंग्लिश स्कूल, सदाशिव पेठ शाखा येथील इ. दहावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मुद्रण पदविका या बद्दल माहिती देण्यात आली. प्रवेश प्रक्रिया, कागदपत्रे व प्रिंटिंग क्षेत्रातील विविध संधींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

### ट्रिपल पी सेमिनार

पुना प्रेस ओनर्स असोसिएशन यांच्या मार्फत ट्रिपल पी या विषयावर प्रा. डॉ. अंजन कुमार बराल यांचा सेमिनार आयोजित करण्यात आला होता. प्रा. रोशन चौधरी यांनी या सेमिनार मध्ये सहभाग घेतला.

***

## ✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक ✻



महिला दिनानिमित्त शिक्षिका व विद्यार्थिनींचा सत्कार करताना मान्यवर



शिक्षकांशी संवाद साधताना आमदार श्री. किशोर दराडे, मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, श्री. संजय चव्हाण, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**हेडमिस्ट्रेस : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### मॅजिक शो

दि. २५ जानेवारी २०२४ रोजी मोठ्या गटासाठी मॅजिक शो आयोजित करण्यात आला होता.

### पालक सभा

दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी पालकांसाठी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या लेखी घटक चाचणीच्या उत्तरपत्रिकांचे वाटप करण्यात आले. या सभेस शिशुगट, छोटा गट आणि मोठ्या गटातील विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पपेट शो

दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी सर्व गटांच्या विद्यार्थ्यांसाठी 'पपेट शो' चे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी त्याचा आनंद घेतला.

### राष्ट्रीय जंतनाशक दिन

दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सर्व गटाच्या पालकांना बोलावून त्यांच्या मुलांना देण्यासाठी जंतनाशकाच्या गोळीचे वाटप करण्यात आले.

### शाळेच्या वेळात बदल

दि. २१ फेब्रुवारी २०२४ पासून बारावीच्या परीक्षेमुळे पूर्व प्राथमिक विभागाची वेळ बदलण्यात आली होती.

## प्राथमिक विभाग

### जादूचे प्रयोग व झेंबे वाद्य वादन

दि. २५ जानेवारी २०२४ रोजी सकाळ वृत्तपत्राद्वारे आयोजित 'यंग बझ' या उपक्रमांर्तगत पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी जादूचे प्रयोग व त्यानंतर झेंबे वाद्य वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पुणे विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी जादूगार श्री. प्रसाद कुलकर्णी यांनी जादूचे वेगवेगळे प्रयोग दाखवत विद्यार्थ्यांची मने जिंकली. काही विद्यार्थी आणि शिक्षकांनीही जादूच्या प्रयोगात सहभाग घेतला. यानंतर झेंबे वाद्य वादक श्री. अनिकेत आंबेवाले यांनी झेंबे वाद्याबद्दल माहिती देत वाद्य कसे वाजवले जाते याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवले. प्र. मुख्याध्यापिका तसेच शिक्षकांनीही झेंबे वाद्य वाजवण्याचा आनंद घेतला.

### प्रजासत्ताक दिन

शिक्षिका सौ. अर्चना सुदन यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगितली.

### जादूचे प्रयोग

दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिध्द जादूगार श्री. जितेंद्र रघुवीर यांनी विद्यार्थ्यांना जादूचे प्रयोग दाखवले.

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा

'नव्या दिशेचे नव्या उषेचे गीत सूर हे गाती
या मंगल देशाचे आहे, भविष्य अपुल्या हाती.'

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये दि. १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत प्राथमिक विभागाने सहभाग घेतला. शासनाने निर्देशित केलेल्या १६ उपक्रमांवर शाळेने काम केले. त्या उपक्रमांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. हात स्वच्छ धुण्याची योग्य पध्दत,

प्लास्टिक मुक्त शाळा, वाचन उपक्रम इ. या सर्व उपक्रमांचे काम शाळेच्या स्वच्छता समितीच्या सर्व सदस्यांनी पाहिले. हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका व पर्यवेक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. तसेच शासनाच्या नियोजित अधिकाऱ्यांनी या योजनेचे परिक्षण शाळेत येऊन केले.

**यंग बझ उपक्रम**

दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी यंग बझ उपक्रमांतर्गत कागदाचे क्षेपणास्त्र (रॉकेट) बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.

**शिवजयंती**

हिंदवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दरवर्षी दि. १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराज हे वैभव, शौर्य, दया, औदार्य यांचे प्रतिक होते. शिक्षिका सौ. केतकी राजभोज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची माहिती व महती विद्यार्थ्यांना सांगितली.

**शालेय वेळेत बदल**

दि. २१ फेब्रुवारी २०२४ पासून सुरु होणाऱ्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमुळे प्राथमिक विभागाच्या शालेय वेळेत बदल करण्यात आला होता. तसे परिपत्रक पालकांना देण्यात आले.

**मराठी भाषा दिवस**

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी जागतिक मराठी गौरव भाषा दिवस साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून दि. २८ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा दिवस' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. या प्रसंगी इ. १ ली ते इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांनी संत, क्रांतिकारक, समाज सुधारक तसेच महाराष्ट्रातील काही व्यक्तिमत्वांची वेशभूषा धारण केली होती. मराठी विभागाच्या शिक्षिकांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या दिवशी विद्यार्थ्यांनी डब्यामध्ये महाराष्ट्रीयन पदार्थ आणले होते.

**अभिनंदनीय**

दि. १४ ऑक्टोबर २०२३ रोजी इंटरनॅशनल इंग्रजी ऑलिंपियाड स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे-

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता/तुकडी |
|---|---|
| कु. स्वानंद पाठक | इ. २ री ड |
| कु. आरव वाडेकर | इ. २ री इ |
| कु. वेद पडवळ | इ. २ री ड |
| कु. कार्तिक माने | इ. ३ री क |
| कु. अभेद्य गायकवाड | इ. ३ री ब |
| कु. अनुश्री केदारी | इ. ३ री ब |
| कु. गौरांग पुणतांबेकर | इ. ३ री ड |
| कु. सौमित्र कुलकर्णी | इ. ३ री क |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ |
| कु. गायत्री सावंत | इ. ४ थी इ |
| कु. विहाम उंबरकर | इ. ४ थी इ |
| कु. वैष्णवी सावंत | इ. ४ थी इ |
| कु. आयुष सुतार | इ. ४ थी इ |

दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान ऑलिंपियाड परीक्षेत सुवर्णपदक विजेते विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| | |
|---|---|
| कु. सस्वीका शेंडे | इ. २ री ड |
| कु. श्रावणी परदेशी | इ. २ री ड |
| कु. रियांश बोराडे | इ. २ री अ |
| कु. तनिष्का सावंत | इ. ३ री ड |
| कु. अनिष घोडके | इ. ३ री ब |
| कु. गायत्री नाईक | इ. ३ री क |
| कु. स्वरा दळवी | इ. ४ थी अ |
| कु. श्रिया चौधरी | इ. ४ थी अ |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ |

**उत्तर पत्रिका वाटप**

दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुसऱ्या सत्रातील घटक चाचणीच्या उत्तरपत्रिकांचे वाटप करण्यात आले व विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच शासन निर्देशनाप्रमाणे जंतनाशक गोळ्या विद्यार्थ्यांना देण्यात आल्या.

### आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन

दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी शिक्षिका सौ. कोमल कुलकर्णी यांनी आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### वार्षिक शैक्षणिक प्रदर्शन

शनिवार दि. २४ फेब्रुवारी २०२४ रोजी शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ चे प्रदर्शन भरविण्यात आले. इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयानुसार प्रकल्प तयार केले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी चित्रकला व कार्यानुभव या विषयांचे प्रकल्पही प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे पुणे विद्यार्थी गृहाच्या मुद्रण अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी श्री. सुबोध कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संचालक श्री. आनंद कुलकर्णी उपस्थित होते. सदर प्रदर्शनाला पालकांनीही भेट देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## माध्यमिक विभाग

दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिध्द जादूगार श्री. जितेंद्र रघुवीर यांचे जादूचे खेळ इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

### निरोप समारंभ

दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. मुख्याध्यापिका सौ. मीना राणे यांनी १० वी च्या विद्यार्थ्यांना एस. एस. सी. बोर्ड परीक्षेसाठी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका सौ. सायली धाक्रस यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी असणाऱ्या सर्वसाधारण सूचना दिल्या. शिक्षिका सौ. मंजिरी ओझरकर आणि सौ. माधुरी शिंदे यांनी 'दहावीला सोमोरे जाताना' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी कु. गार्गी जोशी इ. १० वी अ, कु. मानस सुंभकर, इ. १० वी ब, कु. वैष्णवी शिंदे, इ. १० वी क, कु. आरोही भोसले, इ. १० वी ड, कु. देवम शर्मा इ. १० इ या विद्यार्थी प्रतिनिधींनी शाळेविषयी व शिक्षकांविषयी असणारी आपआपली मनोगते प्रकट केली.

सन २०२३ - २४ चा 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेचा या वर्षीचा विजेतेपदाचा चषक या वर्षी इ. १० वी क च्या वर्गाला देण्यात आला. या वर्गाच्या वर्गशिक्षिका सौ. अपर्णा रणधीर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### उत्तरपत्रिका वाटप

दि. १२ फेब्रुवारी २०२३ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना बोर्ड पूर्व परिक्षेच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका दाखविण्यात आल्या व पालकांना परीक्षेमधील मुलांच्या प्रगतीबद्दल माहिती देण्यात आली. दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना दुसऱ्या घटक चाचणी परीक्षेच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका दाखविण्यात आल्या आणि झालेल्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती देण्यात आली.

दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी मुक्तांगण इंग्लिश स्कूलचा इंटरॅक्ट क्लब आणि रोटरी क्लब कात्रज यांच्या संयुक्त विद्यमाने इ. ९ वी च्या इंटरॅक्ट क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी समुपदेशिका सौ. पूजा फाटक यांचे 'राग व्यवस्थापन आणि ध्येय निश्चिती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सौ. पूजा फाटक यांनी रागावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि आयुष्यातील ध्येय निश्चित करण्यासाठी कसे काम करावे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट चित्रकला परीक्षानिकाल

सन २०२३ - २४ मध्ये झालेल्या शासकीय एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेचा निकाल पुढील प्रमाणे -

**एलिमेंटरी चित्रकला परीक्षा**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी १८२
पास झालेले विद्यार्थी १५६
परीक्षेचा निकाल ८५ %

**इंटरमिजिएट चित्रकला परीक्षा**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी २०३
पास झालेले विद्यार्थी २००
परीक्षेचा निकाल ९८%

**अभिनंदनीय**

* सन २०२३ - २४ मध्ये झालेल्या शासकीय इंटरमिजिएट चित्रकला स्पर्धेत विद्यार्थिनी कु. श्रुती काळगावकर इ. १० अ हिने गुणवत्ता यादीत १५ वा क्रमांक मिळविला.

* दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२४ रोजी 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ आणि काव्यप्रेमी शिक्षक मंच' आयोजित १५ वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन रांजणगाव येथे आयोजित करण्यात आले होते. शिक्षिका सौ. माणिक जोशी यांच्या 'बाप्पा' नावाच्या कवितेची या संमेलनात निवड झाली. दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी सौ. माणिक जोशी यांनी त्यांच्या कवितेचे वाचन केले यावेळी त्यांना मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

* दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी 'एम. ई. एस. बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल', पुणे येथे झालेल्या '५० मी धावणे' या स्पर्धेत विद्यार्थी कु. सूर्यवर्धन पाठारकर याने दुसरा क्रमांक मिळविला. तसेच 'शटल रन' या स्पर्धेत विद्यार्थिनी कु. भूमी देशपांडे हिला कांस्यपदक व प्रमाणपत्र मिळाले.

* दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी कोथरुड येथे झालेल्या जिल्हास्तरीय सिलंबम चँपियनशिप या स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. समीक्षा पिसे हिला सुवर्णपदक व प्रमाणपत्र मिळाले. तसेच कु. स्वरा पवार हिला रौप्यपदक व प्रमाणपत्र मिळाले. कु. समीक्षा पिसे व कु. स्वरा पवार या दोघींची राज्यस्तरीय सिलंबम चँपियनशिपसाठी निवड झाली आहे. याच स्पर्धेत विद्यार्थिनी कु. अर्पिता खर्डे इ. ६ वी क हिला कांस्यपदक व प्रमाणपत्र मिळाले.

* दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी निगडी, पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेत 'काटा' आणि 'कुमिते' या प्रकारात इ. ६ वी क मधील कु. नील कोंढरे याने दोन सुवर्णपदके मिळविली.

* दि. ११ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या लोणी मॅरेथॉन या स्पर्धेत विद्यार्थिनी कु. आराध्या अडक इ. ६ वी अ हिला सुवर्णपदक मिळाले.

* दि. ११ फेब्रुवारी २०२४ रोजी इंडियन मार्शल आर्ट असोसिएशन द्वारा आयोजित राज्यस्तरीय चँपियनशिपमध्ये 'ज्युडो' या क्रीडाप्रकारात विद्यार्थी कु. साई सोवनी इ. ६ वी ड याला सुवर्णपदक मिळाले.

* दि. ५ व ६ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्रीय मंडळ आंतरशालेय स्पर्धेत विद्यार्थी कु. सूर्यवर्धन पाठारकर इ. ६ वी ड याने 'नूम रन' या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक मिळविले. तसेच 'रिले' या क्रीडाप्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला.

* दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी एम.आय.टी. अभियांत्रिकी महाविद्यालय, आळंदी यांचेतर्फे आयोजित स्मार्ट कचरा गोळा करणारे वाहन या प्रकल्पांतर्गत इ. ८ वी ब मधील एनसीसी एअर विंग कॅडेट जय बारमुख याने विशेष पुरस्कार मिळवला. तसेच कॅडेट वेदांत वासकर आणि कॅडेट धनराज बारटक्के इ. ८ वी ब यांनाही सहभागाबद्दल IICER यांच्याकडून प्रमाणपत्र मिळाले.

* दि. २ ते ४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान मिरामर येथे झालेल्या स्विमॅथॉन या १ कि मी पोहोण्याच्या स्पर्धेत विद्यार्थी कु. अजय कांबळे इ. ८ वी अ याने तृतीय क्रमांक मिळविला.

* दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी पुणे जिल्हा हिंदी अध्यापक संघाच्या वतीने हिंदी दिनानिमित्त आयोजित निबंध लेखन स्पर्धेत विद्यार्थिनी कु. अस्मिता शिळीमकर - इ. ६वी इ, कु. स्पंदना भिलारे - इ. ७ वी अ, कु. श्रेया कडू इ. ९ वी क यांना चषक आणि प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास सर्वोत्कृष्ट सहभागाबद्दल चषक प्राप्त झाला.

✻ पी.डी.ए.ए.ए. आयोजित सणस ग्राऊंड, पुणे येथे झालेल्या जिल्हास्तरीय लांबउडी या क्रीडाप्रकारात विद्यार्थी कु. ध्रुव चव्हाण इ. ६ वी अ याला कांस्यपदक मिळाले. तसेच कु. ध्रुव चव्हाण याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

✻ दि. ७ जानेवारी २०२४ रोजी पुणे जिल्हा ॲमॅच्युअर ॲथलेटिक्स असोसिएशन द्वारा आयोजित ट्रॅयपॉलॉन या क्रीडाप्रकारात विद्यार्थिनी कु. भूमी देशपांडे इ. ८ वी ब हिला रौप्यपदक मिळाले.

✻ रंगोत्सव सेलिब्रेशन या राष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. अवनी झेंडे हिला सुवर्णपदक मिळाले.

✻ दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी एम. ई. एस. बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे येथे झालेल्या ४ X ५० मी रिले या क्रीडाप्रकारात विद्यार्थिनी कु. भूमी देशपांडे इ. ८ वी ब, कु. मनाली गोतारणे इ. ८ वी ड यांना सुवर्णपदक मिळाले.

✻ दि. २४ फेब्रुवारी २०२४ रोजी आयुका पुणे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, प्रकल्प बनविणे अशा विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. विद्यार्थिनी कु. तनिष्का रसाळ, इ. ९ वी ब हिने निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला.

✻ कला आविष्कार फाऊंडेशन तर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेत विद्यार्थिनी कु. रोमा मैंदर्गीकर हिला तृतीय क्रमांकाचा चषक आणि प्रमाणपत्रही प्राप्त झाले.

✻ ग्राहक पेठ व पार्लेजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रकला स्पर्धेत विद्यार्थिनी कु. समीक्षा कोकरे इ. ९ वी ड आणि विद्यार्थी कु. सुयश बोर्डे इ. १० वी ड या विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !** ✻✻✻

**✻ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻**



↑ दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी इ. १० वी निरोप समारंभ प्रसंगी 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेच्या विजेतेपदाचा चषक प्राचार्या सौ. मीना राणे यांच्या हस्ते स्वीकारताना इयत्ता १० वी क चे विद्यार्थी



← 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ आणि काव्यप्रेमी शिक्षक मंच' १५ व्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात कविता वाचन प्रसंगी मिळालेल्या मानचिन्ह व प्रमाणपत्रसह सौ. माणिक जोशी

# विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभाग,

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी), श्रीमती पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### क्रीडा स्पर्धा बक्षीस समारंभ

खेळ हा विद्यार्थी जीवनातील एक महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. खेळामुळे मन व बुध्दी यांचा विकास होतो. 'आरोग्यम् धनसंपदा' याचे महत्त्व आपल्याला माहित आहेच. खेळामुळे शिस्त, संघभावना, नेतृत्व यांसारखे गुण वाढीस लागतात. शाळेत आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम दि. १.२.२०२४ रोजी शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. शिक्षकांनी स्टेजवर फुगे व खेळांचे पोस्टर यांची छान सजावट केली होती. कार्यक्रमासाठी पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन्, श्रीमती पूजा फरिया तसेच प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव उपस्थित होत्या. या सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला व बक्षीस समारंभ कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. तसेच क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या परंतु बक्षीस पात्र नसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे ही अभिनंदन करुन त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती नेहा कर्णिक यांनी केले. श्रीमती वंदना आवळे यांनी सर्व पाहुण्यांचे व उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.

### अभिनंदन वार्ता

पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया यांना 'श्री घाटकोपर वगड विसा ओसवाल समाजातर्फे' 'प्रतिष्ठित घाटकोपर वागड महिला आयकॉन पुरस्कार २०२४' ने सन्मानित करण्यात आले. दि. ८ मार्च २०२४ रोजी भुरीबेन सभागृह, कामा लेन, घाटकोपर पश्चिम येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, श्रीमती पूजा फरिया यांच्या शिक्षण क्षेत्रातील विशेष योगदानामुळे त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा प्रतिष्ठित पुरस्कार पूर्व प्राथमिक डोमेनमधील बालमनाची जडणघडण करणे, त्यावर सुसंस्कार करणे व त्यांना प्रोत्साहन देणे, याबाबतचे श्रीमती पूजा फरिया यांचे समर्पण आणि नेतृत्व अधोरेखित करतो. हा कार्यक्रम नामवंत समाजसेवक व नेते श्री. प्रवीण छेड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली महिला समितीने आयोजित केला होता. श्रीमती पूजा फरिया यांच्या कर्तृत्वाला तो मानाचा मुजराच आहे.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी व प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

### पालकत्व सभा

पाल्याच्या सर्वांगीण विकासामध्ये जितके महत्त्वाचे पाल्य, शिक्षण आणि शिक्षक असतात त्याचप्रमाणे अजून एक महत्त्वाचा घटक म्हणजे पालक म्हणजे 'पालक'. आपल्या बाळाला योग्य शिस्त लावणे आणि संस्कार देणे ही एक चांगल्या पालकत्वाची लक्षणे आहेत. प्राथमिक मराठी माध्यमाच्या पालकांसाठी 'पालकत्व' या विषयावर अशीच एक खास सभा दि. २२.२.२०२४ रोजी घेण्यात आली. या सभेचा मूळ हेतू हा पालकांना पाल्याच्या निकोप वाढीसाठी वैद्यकीय दृष्टीने योग्य असणाऱ्या सुयोग्य आणि गरजेच्या पध्दती समजावणे व त्याकरिता मार्गदर्शन करणे हा होता.

मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी पालकांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पालकत्वा-सारख्या

विविध विषयांच्या उद्‌बोधनाची गरज का आहे, हे सांगण्यात आले. शाळेची समुपदेशिका कु. वैष्णवी विलास वाघ यांनी पालकत्वाची ही सभा इ. १ली व २री च्या पालकांसाठी दुपारी १.०० ते २.०० च्या दरम्यान घेतली, आणि इ. ३री व ४थी च्या पालकांसाठी दुपारी २.३० ते ३.३० च्या दरम्यान घेण्यात आली.

समुपदेशिकेने मानसिक आरोग्य म्हणजे काय आणि पाल्याचे मानसिक आरोग्य सुदृढ ठेवणे का गरजेचे आहे या विषयी समजावले. पालक हा बाळाच्या सर्वांगीण विकसासाठीचा महत्त्वाचा घटक असून योग्य पालकत्वाची जबाबदारी ही सर्व पालकांची असते. पालकत्व म्हणजे काय? तसेच योग्य पालकत्वाची ध्येयं, पालकांनी बाळाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न, बाळाच्या मनाची काळजी आणि त्याच्या मनातील प्रश्न सोडविण्यासाठी विविध पर्याय, या विषयी चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमात बाळाची मानसिक स्थिती समजून घेणे आणि त्यावर योग्य मलमपट्टी करणे, इतरांशी व मोठयांशी संवाद कसा साधला जातो, योग्य वळण आणि सकारात्मकता अशा अनेक विषयांवर चर्चा करत सुजाण पालकत्वाची गरज पटवून देण्यात आली. पालकत्वाच्या या सभेला पालकांकडून सुध्दा चांगला प्रतिसाद मिळाला.

**कलर बेल्ट ग्रेडेशन परीक्षा**

पुणे विद्यार्थी गृह स्पोर्ट्स अकॅडमी कराटे क्लासेस आयोजित झेन कराटे ॲडवेंचर अँड स्पोर्ट्स असोसिएशन संलग्न 'वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे ऑर्गनायझेशन मेंबर्स कराटे ऑर्गनायझेशन' यांचतर्फे कराटेचे वर्ग जुलै २०२३ पासून विद्याभवन स्कूल, घाटकोपर येथे नियमित सुरू आहेत. कराटे प्रशिक्षकांकडून सरावामार्फत मुलांमध्ये शिस्त, संयम व आत्मविश्वास रुजविला जात आहे.

दि. २४.२.२०२४ रोजी विद्यार्थ्यांची कलर बेल्ट ग्रेडेशन परीक्षा घेण्यात आली. त्यात एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते, सहभागी झालेले सर्व विद्यार्थी ए, बी प्लस व बी श्रेणी प्राप्त करुन उत्तीर्ण झाले. श्रेणी 'ए'-७, श्रेणी 'बी प्लस'-१३, श्रेणी 'बी'-२२. ए श्रेणी मिळविलेले विद्यार्थी खालील प्रमाणे -

| विभाग | विद्यार्थ्यांची नावे | इ/तु |
|---|---|---|
| प्राथमिक इंग्रजी | कु. ध्रुवी पी. चौधरी | १ली/अ |
| | कु. श्लोक जी. चासकर | २री/अ |
| प्राथमिक मराठी | कु. शिवान्या डी. भाईक | २री/अ |
| | कु. स्वरा एस. पठारे | २री/अ |
| | कु. अर्णव एन. विचारे | २री/अ |
| | कु. श्रीणय एस. फडतरे | ३री/अ |
| | कु. सोहम एस. झोरे | ४थी/ब |

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

**शिक्षक प्रशिक्षण**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई आयोजित STARS प्रकल्प सन २०२३-२४ अंतर्गत अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (URC), आणि शिक्षक क्षमतावृध्दी NEP २०२० या प्रशिक्षणाचा लाभ जानेवारी व मार्च २०२४ या काळात इ. ५वी ते १०वी च्या सर्व शिक्षकांनी घेतला.

दि. १० फेब्रुवारी २०२४ रोजी सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता यावा यासाठी Digital Board चा वापर अध्ययन अध्यापनात कसा करावा याचे प्रशिक्षण इ. ५वी ते १०वी च्या सर्व शिक्षकांना दिले.

**मराठी भाषा दिन**

दि. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त प्रशालेत 'मराठी राजभाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे मराठी विषयाचे निवृत्त प्राध्यापक आणि आचार्य कॉलेजचे उपप्राचार्य गिरीश जोशी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती

देसाई, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. मराठमोळ्या वातावरणात पाहुण्यांचे स्वागत औक्षणाने करण्यात आले. पाहुण्यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेवा जोशी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या दिनाचे औचित्य साधून इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना मराठी साहित्यातील साहित्यिक, संत, कविता इत्यादींची माहिती जमा करण्यास सांगितली होती. विद्यार्थ्यांनी संत मुक्ताबाई, संत तुकाराम, कवियत्री बहिणाबाई, शांता शेळके आदी दिग्गज साहित्यिकांची ओळख, त्यांच्या साहित्यकृती आधारे करुन दिली. त्याचप्रमाणे काही विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करणारी गीते आणि एकपात्री प्रयोग सादर केले. त्याचबरोबर नटसम्राट नाटकातील एका प्रसंगाचे सादरीकरण पार्थ राणे या विद्यार्थ्याने केले.

प्राध्यापक श्री. गिरीश जोशी यांनी मुलांना समजतील अशा साध्या व सोप्या भाषेत मराठी साहित्यातील काही उदाहरणे दिली. तसेच सर्वांनी आपल्या मातृभाषेचा आणि इतर भाषांचा आदर करावा, उत्तम भाषा बोलता व लिहिता आली पाहिजे असा मोलाचा सल्ला दिला. तसेच त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांचे संपूर्ण जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी सर्व विद्यार्थी व शिक्षकांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगून मराठी भाषा टिकवण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी दैनंदिन उदाहरणे दिली. मातृभाषा जर व्यवस्थित आत्मसात केली तर इतर भाषा सुध्दा सहज आत्मसात करता येतील असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

या कार्यक्रमाचे सूचत्रसंचालन विद्यार्थिनी कु. मानसी नायकोडी व कु. अपेक्षा पिंगट, इ. ९वी यांनी केले. कु. जास्मिन इनामदार, इ. ९वी हिने मानलेल्या आभार प्रदर्शनाने व महाराष्ट्र गौरव गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८.२.२०२४ रोजी विज्ञान दिनानिमित्त डॉ. होमी भाभा सायन्स सेंटर या ठिकाणी दि. २८ व २९ फेब्रुवारी २०२४ रोजी दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. सुनिता वायकर व श्री. अर्जुन मस्के यांनी इ. ७वी/८वी च्या विद्यार्थ्यांना चर्चासत्राला नेण्याचे नियोजन केले.

डॉ. होमी भाभा सायन्स सेंटर येथे इ. ७वी/८वी चे एकूण ५० विद्यार्थी, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई व शिक्षक श्रीमती सुनिता वायकर, श्री. संजय परदेशी यांनी क्षेत्रभेट दिली. विद्यार्थ्यांनी तेथे शैक्षणिक खेळ, थंड रसायने, गणिती खेळ, Starry Sky अशा अनेक गोष्टींचा आनंद घेतला.

माजी विद्यार्थी कुणाल वाघमारे याने विद्यार्थी वैज्ञानिक खेळाचा आनंद घेत असताना प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देत मोलाचे सहकार्य केले.

### जागतिक महिला दिन

गुरुवार दि. ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, मराठी माध्यमाच्या सहा. शिक्षिका व महिला पालकवर्ग उपस्थित होता.

महिला दिनानिमित्त महिला पालकांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ६वी व ७वी च्या

महिला पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या प्रसंगी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच आपल्यातील कलागुण आपणच जोपासले पाहिजेत व महिलांची ही कला खरोखरच कौतुकास्पद आहे असे म्हणत स्पर्धक महिलांचे कौतुक केले.

स्पर्धक महिलांनी सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या. आकृतीप्रधान व संस्कार भारती या प्रकारातील रांगोळ्यामध्ये आकर्षक अशी रंगसंगती होती, सुबकता होती.

या रांगोळयांचे परीक्षण कला शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांनी केले. बक्षिसपात्र स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे - श्रीमती सुतार शर्मिला, श्रीमती सुर्गीरे मयुरी, श्रीमती आंबी शीतल सतिश, श्रीमती हेगिष्टे मधुरा

### अभिनंदन वार्ता

दि. ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त हिमगिरी ग्लोबल गुरुकुल संस्था आणि महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदे मार्फत कर्तृत्वान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन 'सावित्री सन्मान पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

### क्षेत्रभेट

दि. ११.३.२०२४ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई व शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग 'समग्र शिक्षा समावेशित शिक्षण' यांच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई आणि वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, भायखळा येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.

या क्षेत्रभेटीमध्ये आपल्या एन वॉर्ड विभागातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मिळून १८० जणांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी शंभर वर्षांपूर्वीच्या वस्तुसंग्रहालयातील ऐतिहासिक वस्तुंची माहिती घेतली आणि राणीच्या बागेत प्राणी व पक्षांबरोबरच, झाडे व फुले यांची थोडक्यात माहिती घेतली व निसर्ग सहवासाचा मनमुराद आनंद लुटला.

या क्षेत्रभेटीत प्रशालेतील विद्यार्थिनी कु. मनस्वी चंद्रकांत मोरे इ. ८वी ही सहभागी झाली होती.

### फॅन्टॅस्टिक शॉप स्टॉल उपक्रम

दि. १३.३.२०२४ रोजी शाळेच्या सभागृहात इ. ६वी च्या विद्यार्थ्यांसाठी फॅन्टॅस्टिक शॉप उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध वस्तूंचे स्टॉल्स् लावले होते. त्या स्टॉल्सला भेट देणारे ग्राहक आणि दुकानदार यांनी एकमेकांशी इंग्रजी भाषेत संवाद साधला.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांचे इंग्रजी बोलण्याचे कौशल्य विकसित व्हावे यासाठी हा उपक्रम घेण्यात आला. या संपूर्ण उपक्रमादरम्यान मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार उपस्थित होत्या. विद्यार्थी इंग्रजीत बोलत असताना त्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. इतर शिक्षकांनीही या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या दुकानांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्याकडून विक्रीसाठी असलेल्या वस्तूंचीही खरेदी केली. हा संपूर्ण उपक्रम श्रीमती मनीषा जायभाये आणि श्री. रुपेश मांडवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

### डिजिटल बोर्ड उद्घाटन

दि. १९.१.२०२४ रोजी विद्याभवन हायस्कूलने पाच डिजिटल इंटरॲक्टीव्ह लर्निंग बोर्डस्च्या माध्यमातून शैक्षणिक तंत्रज्ञानात एक उत्तुंग झेप घेतली. हा स्तुत्य उपक्रम रोटरी क्लब ऑफ मुंबई, घाटकोपर पूर्व च्या मदतीने साकार झाला.

या देणगी संदर्भात श्रीमती सुनिता अग्रवाल यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या बहुमूल्य योगदानामुळे विद्यार्थ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेता येणार आहे.

या डिजिटल बोर्डस्चे उद्‌घाटन श्रीमती सुनिता अग्रवाल, श्री. राहुल खत्री आणि रोटरी क्लब ऑफ मुंबई, घाटकोपर पूर्वचे श्री. टी. एस. विश्वनाथ्न आणि श्री. करण पिल्लई यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी मान्यवरांचा सत्कार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.

श्री. राहुल खत्री यांनी या कार्यक्रमादरम्यान शाळेसाठी आणखी एक डिजिटल बोर्ड देण्याची घोषणा केली. त्यांच्या या दातृत्वाचे शाळा व संस्थेतर्फे मनःपूर्वक कौतुक करण्यात आले.

**बास्केटबॉल स्पर्धा**

दि. २५.२.२०२४ रोजी माध्यमिक इंग्रजी विभागाच्या यु-१४ मुले आणि मुली आय.ई.एस. स्कूल, वांद्रे येथे रामा स्पोर्ट्स द्वारे आयोजित आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेसाठी गेले होते. १४ वर्षांखालील मुलींनी सुवर्णपदक जिंकले, तर १४ वर्षांखालील मुले उपविजेते ठरली. शाळेला असे उज्ज्वल यश मिळवून दिल्याबद्दल सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन. विजेत्या संघांची नावे खालीलप्रमाणे :

**यु-१४ मुली**

| विद्यार्थिनींची नावे | इ / तु |
|---|---|
| कु. अनन्या मनोज पाटील | ८वी/अ |
| कु. सिमरन किशोर खळे | ८वी/अ |
| कु. श्रिया अतुल डिग्रजकर | ८वी/अ |
| कु. वेदिका मिलिंद जायगडे | ८वी/अ |
| कु. सारा चंद्रकांत देसाई | ८वी/ब |
| कु. रक्षिता विलास चव्हाण | ७वी/अ |
| कु. लैशा संजय ओबेरॉय | ७वी/क |
| कु. तन्वी पंजाबराव मोरे | ७वी/ब |
| कु. काव्या महेश भोगले | ७वी/अ |
| कु. ईशान्या भाईदास शिंदे | ७वी/क |
| कु. श्रुती मिलिंद भंगाळे | ७वी/ब |
| कु. श्रध्दा महेश पनमन | ७वी/अ |

**यु-१४ मुले**

| | |
|---|---|
| कु. श्रीनिवास नितीन परब | ८वी/अ |
| कु. आदित्य संदिप जरे | ८वी/अ |
| कु. प्रीतम मैती | ८वी/ब |
| कु. अंश चंद्रप्रकाश प्रजापती | ८वी/अ |
| कु. वेदांत रमेश कोंडुस्कर | ८वी/अ |
| कु. वेदांत संदीप हांडे | ८वी/अ |
| कु. ओम् वैभव गुजर | ७वी/ब |
| कु. कुणाल नितीन शिंदे | ७वी/क |
| कु. भव्य मनोज निकम | ७वी/ब |
| कु. क्रीद्या दिनेश घनकुटे | ७वी/ब |
| कु. पृथ्वीराज विठ्ठल नावडे | ६वी/ब |
| कु. अंश सुशील सहानी | ७वी/अ |

**जागतिक महिला दिन**

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या वतीने प्रशालेत जागतिक महिला दिन गुरुवार दि. ८.३.२०२४ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात 'सलाड सजावट' हा महिला पालकांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. सदर कार्यक्रम श्रीमती प्रेमकुमारी झा, श्रीमती सायली चव्हाण व श्रीमती हर्षदा गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील व समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् यांनी सदर कार्यक्रमास भेट दिली. मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी सहभागी पालकांचे कौतुक करुन खालील विजेत्या पालकांना पुष्पगुच्छ व रोख पारितोषिके देऊन गौरविले. विजेत्या पालकांची नावे खालील प्रमाणे - श्रीमती सरस्वती आलारे, श्रीमती सारा देसाई, श्रीमती स्मिता धुमाळ

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

***

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊




'प्रतिष्ठित घाटकोपर वागड महिला आयकॉन पुरस्कार २०२४'
स्वीकारताना श्रीमती पूजा फरिया



पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना समन्वयिका, पर्यवेक्षिका, शिक्षिका त्यांच्या समवेत यशस्वी विद्यार्थिनी





पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभाग - क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण करताना मुख्याध्यापक, समन्वयिका, पर्यवेक्षिका, शिक्षक व त्यांच्या समवेत यशस्वी विद्यार्थिनी व विद्यार्थी





कराटे कलर बेल्ट ग्रेडेशन परीक्षेत ए ग्रेड प्राप्त प्राथमिक इंग्रजी आणि प्राथमिक मराठीच्या विद्यार्थ्यांसमवेत प्रशिक्षक श्री. नितीन रामराजे

## ⁕ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁕



'जागतिक मराठी भाषा गौरव दिन' कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. गिरीश जोशी यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील



'फॅन्टॅस्टिक शॉप मॉल' ॲक्टिव्हिटी सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार



डिजिटल बोर्डच्या उद्घाटनप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व उपस्थित मान्यवर



दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आयोजित क्षेत्रभेट या उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी व पालक

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी** **मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### इयत्ता दहावी आशीर्वाद समारंभ

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात इयत्ता दहावी आशीर्वाद समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालकश्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, पालक - शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. सुदाम सूर्यवंशी, शिक्षकवृंद आणि इयत्ता दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते.

मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन संपन्न झाले. विद्यार्थी चि. ईशान गवळी इ. १०वी याने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी संचालक श्री. अमोल जोशी आणि श्री. सुदाम सूर्यवंशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून वसतिगृह आणि विद्यालयातील आठवणी कथन केल्या. मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी मार्गदर्शनपर भाषण केले. संचालक श्री. अमोल जोशी यांनी 'विदयार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे'असे सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी केले. चि. संजय चौधरी या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन केले. कार्यक्रमानंतर सर्वांनी अल्पोपहाराचा आस्वाद घेतला.

### राजभाषा मराठी दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे अध्यक्षतेखाली राजभाषा मराठी दिन साजरा करण्यात आले. प्रमुख अतिथी श्री. प्रभाकर दुसाने उपस्थित होते. मुख्याध्यापक, प्रमुख अतिथी आणि सर्व शिक्षकांनी प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या कविता सादर केल्या. विद्यार्थी चि. श्री साबळकर याने कुसुमाग्रजांचे कवितासंग्रह, नाटक, कथासंग्रह याविषयी माहिती सांगितली. ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी कुसुमाग्रजांचे शिक्षण, बालपण आणि साहित्यिक कार्याविषयी माहिती सांगितली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी 'सर्वानी आपल्या मातृभाषे - विषयी अभिमान बाळगावा' असे सांगितले. चि. दर्शन जमधडे या विद्यार्थ्याने आभार मानले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे आणि शिक्षकांनी नोबेल पारितोषिक प्राप्त सी. व्ही. रमण यांचे प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इ. ५वी च्या विद्यार्थ्यांनी 'प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा' हे विज्ञान गीत सादर केले. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी 'ज्ञानाचे हे चक्र सुदर्शन' हे विज्ञानाची महती सांगणारे गीत सादर केले. इ. ८वी च्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रतिज्ञा सादर केली. इ. ६वी च्या विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनपर नाटिका सादर केली. श्री. गौरव झुरडे यांनी सी. व्ही. रमण यांच्या संशोधन कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी 'दैनंदिन जीवनात अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता विज्ञानाची कास धरा' असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. नितीन महाले आणि आभार प्रदर्शन चि. दर्शन जमधडे या विद्यार्थ्यांनी केले.

### जागतिक महिला दिन

दि. ८ मार्च २०२४ रोजी विद्यालयात जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांचे अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी महिला दिनाचे महत्त्व सांगितले. शिक्षक श्री. तुकाराम मंडले, श्री. गौरव झुरडे आणि

लिपिक श्री. भालचंद्र कुलकर्णी यांनी विद्यालयातील महिला शिक्षिकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी विविध कर्तृत्त्ववान महिलांविषयी माहिती सांगितली. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

**अभिनंदनीय**

जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांना महिला दिनानिमित्त 'कर्तव्यदक्ष महिला पुरस्कार' स्वर्गीय उत्तमरावजी ढिकले कला स्पोर्ट्स फॉउंडेशन आणि डी. एस. एफ. नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने आमदार श्री. राहुलजी ढिकले यांचे शुभहस्ते मिळाला. श्रीमती सुनंदा ठाकरे यांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन. ✻✻✻

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

**वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न**

महाविद्यालयामध्ये 'अद्वैय २०२४' अंतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. विविध स्पर्धा व उपक्रमांत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बॅटमिंटन, कॅरम, बुद्धिबळ आणि कब्बडी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मिसमॅच डे, ग्रुप डे, रेट्रो / बॉलीवूड डे, ट्रेडिशनल डे या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संगीत, गायन आणि नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. फॅशन शो प्रसंगी विद्यार्थ्यांनी रामायण आणि महाभारताच्या सर्व पात्रांचे घडवलेले दर्शन कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, म्हसरूळ, श्री. सुभाष ढवळे साहेब, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. अमोल जोशी, श्री. सुनील रेडेकर आणि प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, विद्यार्थी प्रतिनिधी कु. पवन अहिरे, सांस्कृतिक सचिव साहिल भागवत आणि मुलींची प्रतिनिधी सुप्रिया बोडके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. इंद्रजीत सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन गुंजन जयराज, दिशांत भास्कर, श्रेयसी बागुल आणि मृण्मयी चिटणीस यांनी केले. प्रा. आरती पिंगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

**छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी**

महाराष्ट्रातील थोर व्यक्तिमत्त्व, धाडशीवृत्ती, व्यवस्थापन कौशल्य आणि स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, प्राध्यापक, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी कु. अथर्व कुलकर्णी याने केले. त्याने छत्रपती शिवाजी महाराज यांनी व्यवस्थापन कौशल्याच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याचे स्वप्न कसे पूर्ण केले, याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. निवृत्ती

डावखर यांनी केले. ग्रंथपाल श्री. संदीप दराडे यांनी सर्वांचे आभार मानले

**'मराठी राजभाषा गौरव दिन' उत्साहात साजरा**

महाविद्यालयामध्ये कविवर्य विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने 'मराठी राजभाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला.

प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, डॉ. अमोल रासने, डॉ. सोनाली जाधव, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्रा. शुक्ला, ग्रंथपाल प्रा. संदीप दराडे, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. वेदांत भोर याने केले. विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी प्रा. सुहास धारणे यांनी आधुनिक युगात मराठी भाषेच्या विविध पैलूवर चर्चा केली. वि. वा. शिरवाडकर यांनी १९९० साली नाशिकमध्ये 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' नावाची एक संस्था सुरू केली. महाराष्ट्राची बोलीभाषा मराठीला साहित्यविश्वात विशेष असे स्थान निर्माण करून देण्यामागे कुसुमाग्रजांची अपार मेहनत आहे. तसेच त्यांनी कुसुमाग्रजांची कणा कविता, नटसम्राट नाटक आणि विशाखा कवितासंग्रहाविषयी माहिती दिली.

महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर यांनी केले. कु. श्रावणी घुगे हिने उपस्थितांचे आभार मानले. त्याला कु. प्राजक्ता देवरे यांचे सहकार्य लाभले.

**शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा**
**नॅक मूल्यांकनात 'अ' श्रेणी**

अभियांत्रिकी व श्रीकृष्ण एस. धामणकर व्यवस्थापन महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेने महाविद्यालयास 'अ' श्रेणी देऊन मानांकित केले. शैक्षणिक पात्रतेच्या विविध घटकांच्या मूल्यमापनात महाविद्यालय सरस ठरले आहे. महाराष्ट्रातील अग्रगण्य महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक दर्जासाठी ओळखल्या जाणाऱ्या पुणे विद्यार्थी गृहाच्या नाशिक येथील महाविद्यालयाने 'अ' मूल्यांकन प्राप्त करून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. प्राचार्य डॉ. मनोज भालेराव तसेच आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रा. डॉ. अमोल रासने यांच्या अथक परिश्रम व मार्गदर्शनातून हे साध्य झाले. महाविद्यालयास श्रेणी मिळविण्याकरिता सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच विद्यार्थी, पालक आणि माजी विद्यार्थी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

***

**समाचार माहे मार्च २०२४ दुरुस्ती पृष्ठ क्र. ३९**

●**नाव** - **संस्थेचे कुलगुरु कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांचे ज्येष्ठ पुत्र कै.गजानन विष्णु केतकर यांच्या कन्या सौ. अमृता कुमार जोगळेकर, पुणे**

**देणगी** - रु. २१,०००/-

**दिनांक** - १५.१.२०२४

**निमित्त** - कै. गजानन विष्णु केतकर
कै. कमल गजानन केतकर,
कै. भारती गजानन केतकर व
कै. रमेश गजानन केतकर
स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थेच्या धनुर्धारी श्रीराम मंदीराच्या रंगकामासाठी दिलेली आहे.

***

# शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

### वृक्षारोपण

दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात सहशालेय अभ्यासक्रमांतर्गत 'वृक्षारोपण' करण्यात आले. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. धर्मेंद्र जोपळे यांनी केले होते.

### कवी मुलाखतीचे आयोजन

दि. ४ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात बी. एड. अभ्यासक्रमातील 'कला आणि नाटक' या विषयांतर्गत 'कवींची मुलाखत' आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे आणि कवी म्हणून कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, त्र्यंबकेश्वर येथील प्राचार्य डॉ. दिलीप पवार हे उपस्थित होते. प्रा. मनिषा पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अध्यक्षांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रारंभी डॉ. पवार यांनी त्यांची सर्वात पहिली रचलेली 'वीट कशी न ढळली' ही कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. त्यानंतर प्रा. मनिषा पाटील यांनी मुलाखतीला सुरुवात केली. उपस्थित विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी कवींना वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न विचारले. त्यावर डॉ. पवार यांनी दिलखुलास उत्तरे दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन कवितेच्या माध्यमातून केले. डॉ. पवार यांनी 'बाप' ही भावनिक कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या चारोळ्या ऐकवून सर्वांना हसवले. सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने या मुलाखतीत सहभाग घेतला. शेवटी प्रमुख पाहुण्यांनी त्यांचा कवितासंग्रह भेट म्हणून प्राचार्यांकडे सुपूर्द केला. यावेळी सर्व विद्यार्थी- शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन विद्यार्थिनी-शिक्षिका उन्नती खर्चे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. मनिषा पाटील यांनी केले होते.

### 'जीवन कौशल्ये' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात बी. एड. अभ्यासक्रमातील 'Understanding of Self' या विषयांतर्गत 'जीवन कौशल्ये' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून 'आकार अकॅडमी'च्या प्रमुख डॉ. शर्मिष्ठा ओक उपस्थित होत्या. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थिनी-शिक्षिका लतिका गटकळ हिने करून दिला. त्यानंतर प्राचार्यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रारंभी डॉ. शर्मिष्ठा ओक यांनी जीवन कौशल्यांचे प्रकार सांगितले. तसेच आदर्श शिक्षक बनण्यासाठी कोणकोणती जीवन कौशल्ये आत्मसात केली पाहिजे, याबद्दल मार्गदर्शन केले.

याप्रसंगी विद्यार्थी-शिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी शिक्षिका समता कुलकर्णी व आभारप्रदर्शन विद्यार्थिनी -शिक्षिका कांचन वडजे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रबाब भगत यांनी केले होते.

### 'व्यक्तिमत्त्व विकास' विषयावर व्याख्यानाचे आयोजन

दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात बी. एड. अभ्यासक्रमातील 'Understanding of Self' या विषयांतर्गत 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश पाटील

उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अश्विनकुमार भारद्वाज उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी-शिक्षक रोशन पहाडे याने करून दिला. त्यानंतर प्राचार्यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. अश्विनकुमार भारद्वाज यांनी व्यक्तिमत्त्व विकास कसा करायचा याबद्दल विद्यार्थी-शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी शिक्षिका सारिका पाटील व आभारप्रदर्शन विद्यार्थिनी शिक्षिका नेहा गुप्ता यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रबाब भगत यांनी केले होते.

### 'Resilience' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

दि. १२ फेब्रवारी २०२४ रोजी महाविद्यालयात बी. एड. अभ्यासक्रमातील 'Understanding of Self' या विषयांतर्गत 'Resilience' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून 'अशोका इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशनल स्टडीज अँड रिसर्च', नाशिक येथील प्राध्यापक डॉ. प्रीती सोनार उपस्थित होत्या. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा परिचय विद्यार्थी-शिक्षिका दीपांजली त्रिपाठी हिने करून दिला. त्यानंतर प्राचार्यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. प्रारंभी डॉ. प्रीती सोनार यांनी आपल्या करिअरमध्ये पुन्हा सुरुवात कशी करायची व यशस्वी कसे व्हायचे याबद्दल मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी शिक्षिका उन्नती खर्चे व आभारप्रदर्शन विद्यार्थिनी-शिक्षिका शरयू धकीते यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. रबाब भगत यांनी केले होते.

### छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

दि. २० फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी प्रतिमापूजन केले. त्यानंतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी विद्यार्थी-शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### संत गाडगेबाबा जयंती

दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी  प्रा. अरविंद जिंजर यांनी प्रतिमापूजन केले. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सर्व प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यार्थी-शिक्षक, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### कॅम्पस मुलाखत

दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. श्री. महिमान इंटरनॅशनल स्कूल यांच्यातर्फे मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी विज्ञान, गणित, मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, भूगोल या विषयांसाठी शरयू धकीते, वैशाली भिंगारे, माधुरी पवार, नेहा गुप्ता, नम्रता घुंद्रे, वृषाली घुमरे, मनीषा टर्ले, शाम रिठे, वैष्णवी शेवाळे, श्रेया शिंदे, ऋतुजा गीते, माई बागुल, प्रियांका सांभ, रेश्मा सरवदे या विद्यार्थी-शिक्षिका मुलाखतीसाठी उपस्थित होत्या. यावेळी श्री. महिमान इंटरनॅशनल स्कूलचे संचालक निवृत्ती रामजी गीते व उपसंचालक श्रीमती शालिनी निवृत्ती गीते उपस्थित होते.

### मराठी भाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात जेष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस  'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. प्रारंभी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सर्व

विद्यार्थी-शिक्षक तसेच प्राध्यापकांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून कुसुमाग्रजांना अभिवादन केले.

कवीवर्य कुसुमाग्रज तथा तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी-शिक्षकांना स्पर्धेसाठी 'कवी कुसुमाग्रज यांच्या कविता', 'वि. वा. शिरवाडकर' यांची नाटके आणि 'मराठी भाषेची भविष्यकालीन दिशा आणि दशा', हे विषय देण्यात आले होते. स्पर्धेचे नियोजन व आयोजन प्रा. मनिषा पाटील यांनी केले.

**शासनाची 'ना हरकत प्रमाणपत्र' समिती (NOC)**

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्र समितीने महाविद्यालयाला भेट दिली. यावेळी समितीचे अध्यक्ष डॉ. प्रितेश कालण व डॉ. दुर्गेश बोरसे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले. त्यांनतर समितीच्या सदस्यांनी महाविद्यालयाचे कामकाज पाहिले. ※※※

**※ शिक्षणशास्त्र व संशोधान महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक ※**



महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करताना विद्यार्थी



प्राध्यापिका डॉ. प्रिती सोनार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राचार्य डॉ. सुरेश पाटील



← डॉ. अश्विनकुमार भारद्वाज यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राचार्य डॉ. सुरेश पाटील

'मराठी राज भाषा दिन' प्रसंगी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, प्राध्यापक आणि विद्यार्थी शिक्षक ↓



# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## शाळा स्तरीय विविध स्पर्धा

शाळास्तरीय आयोजित विविध स्पर्धांचे विषय आणि विजेते विद्यार्थी खालीलप्रमाणे -

### हस्ताक्षर स्पर्धा

| गट | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|
| इ.१ ली | कु. ऋतुजा सागर गांगोडे |
| | कु. देवश्री राजेंद्र चौधरी |
| | कु. विराज जयवंत लोणारे |
| इ. २ री व इ ३ री | कु. विजय साळवे |
| | कु. अनुष्का रवींद्र बोरसे |
| | कु. तुना फिरदोस फारुख शेख |
| इ ४ थी व इ ५ वी | कु. ग्रीष्मा र. खैरनार |
| | कु. तनुश्री विवेकानंद गिरी |
| | कु. राशी रा. शौचे |
| इ ६ वी व इ ७ वी | कु. तन्वी प्र.रामजीयानी |
| | कु. तनिष्का र. आघाव |
| | कु संजना शिवाजी ढोले |

### मराठी निबंध स्पर्धा विषय

| | |
|---|---|
| इ. ५वी | प्रदूषण एक समस्या |
| | मोबाईल नसता तर |
| इ. ६ वी | साक्षरतेचे महत्त्व |
| | पर्यावरण संवर्धन काळाची गरज |
| इ. ७ वी | पाणी अडवा, पाणी जिरवा |
| | प्लास्टिक मुक्त भारत |

| गट | यशस्वी स्पर्धक |
|---|---|
| इ. ५ वी | कु. मितेश भिकान देशमुख |
| इ. ६ वी | कु. परी अशोक यादव |
| इ. ७ वी | कु. मानसी देविदास चौधरी |

### हिंदी निबंध स्पर्धा

इ. ५ वी ते ७ वी ची हिंदी निंबध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे विषय आणि विजेते खालीलप्रमाणे -

१) पर्यावरण प्रदूषण
२) समय का पालन और अनुशासन का महत्व
कु. निष्ठा प्रविण मुद्गल
कु. वेदांत गणेश थोरात
कु. रुद्र दतात्रय सोनवणे

### कविता गायन स्पर्धा

इ १ ली ते इ ३ री ची कविता गायन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कु. स्वयंम स्वप्नील जाधव | इ. १ ली |
| कु अवनी निळील | इ. १ ली |
| कु ईश्वरी वासुदेव खोडे | इ. १ ली |

### इंग्रजी निबंध स्पर्धा

इंग्रजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात होते. या स्पर्धेचे विषय आणि विजेते विद्यार्थी खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| इ. ५ वी | Importance of cleanliness<br>Conservation of environment |
| इ ६ वी | Advantages & disadvantages of mobile, Importance of Sports |
| इ ७ वी | Influence of Internet on Children<br>Plastic free India |

### स्पर्धेतील विजेत्याची नावे

| | |
|---|---|
| कु. ईश्वरी प्रकाश पवार | इ ६ वी |
| कु. मोक्षा अमित लोहोकणे | इ ५ वी |
| कु. धनश्री विनोद पवार | इ ७ वी |

### शिवजयंती

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. रश्मी कडलग यांनी आणि विद्यार्थी कु. रुद्र घरटे इ. ५ वी व विद्यार्थिनी कु. मृन्मल मोरे इ. ४ थी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची माहिती सांगितली. इ. १ली व इ. २ री चे विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराज यांची वेशभूषा करून आले होते.

### अभिनंदनीय

'गॅलक्सी स्केटिंग चॅम्पियनशिप ट्रॉफी २०२४' मध्ये कु. सिद्धेश समाधान मते याने सुवर्णपदक जिंकले.

### लॉर्ड बेडन पॉवेल

दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी लॉर्ड बेडन पॉवेल स्काऊट गाइडचे जनक, यांची जयंती साजरी करण्यात आली. क्रीडा शिक्षक श्री. विजय साळवे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

### वीर सावरकर पुण्यतिथी

दि. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी वीर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिक्षिका सौ. युगश्री सोनवणे यांनी त्यांच्या कार्याची माहिती दिली.

### मराठी राजभाषा दिन

कुसुमाग्रज जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षिका सौ. रुपाली खरोटे यांनी कुसुमाग्रज यांची माहिती सांगितली. त्यांची कणा ही कविता म्हणून दाखवली. इ ६ वी च्या विद्यार्थ्यांना कुसुमाग्रज यांचेबद्दल माहिती दिली.

सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांच्या तर्फे शाळेला सौ. जयश्री वाघ यांनी भेट दिली. त्यांनी शाळेला कुसुमाग्रज यांची कणा या प्रसिद्ध कवितेची प्रतिमा भेट म्हणून दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी राजभाषा दिनाबद्दल मार्गदर्शन केले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान संबंधी उपक्रम राबविण्यात आला. विज्ञान शिक्षिकांनी सायन्स मॉडेल बनविले होते, ते विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. इ. ६ वी आणि इ. ७ वी च्या काही विद्यार्थ्यांनी मॉडेल बनविले होते. इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांनी भारतीय वैज्ञानिकांचे तक्ते बनविले.

### आरोग्य तपासणी शिबिर

दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी ग्रॅव्हीटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर टीमच्या सहकार्याने एक दिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी इ. १ ली ते इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. काही आजार आढळून आल्यास त्या बद्दल डॉक्टरांनी योग्य सल्ला दिला. सुदृढ आरोग्य, पोषक आहार, व्यायामाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. डॉक्टरांनी प्रथमोपचार, साथीचे रोग याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती केली. तसेच प्रतिबंधात्मक उपाय याविषयी जागृती केली.

### रस्ता सुरक्षा दिन

दि. ४ मार्च २०२४ रोजी सुरक्षा दिन साजरा करण्यात आला. शिक्षक श्री. देवेंद्र कुलकर्णी यांनी रस्ता सुरक्षा दिनाची माहिती सांगितली.

### महिला दिन

दि. ९ मार्च २०२४ रोजी महिला दिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. शुभांगी देशमुख यांनी महिला सबलीकरण व सक्षमीकरण यावर माहिती दिली. कर्तृत्ववान महिलांच्या कार्याविषयी माहिती दिली.

### सावित्रीबाई फुले पुण्यतिथी

दि. १० मार्च २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुण्यतिथीनिमित्त सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्याता आला. शिक्षिका सौ. प्रमिला यांनी त्यांच्या कार्याची माहिती दिली.

### यशवंतराव चव्हाण जयंती

दि १३ मार्च २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. माधुरी गवळी यांनी त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

### विविध स्पर्धा परीक्षेमधील विद्यार्थ्यांचे यश

शाळेत NSTS या इ. ३री व इ. ४ थी साठी परीक्षेचे आयोजन केले होते. या परीक्षेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| | | |
|---|---|---|
| इ ३ री | कु. भालेराव पदमश्री | प्रथम |
| | कु. घडवजे ओजस्वी | द्वितीय |
| | कु. पाठक प्रांजल | तृतीय |
| इ ४ थी | कु. पदर पूर्वा | प्रथम |
| | कु. सोनवणे हंसिका | द्वितीय |
| | कु. खैरनार कस्तुरी | तृतीय |
| | कु. सोनवणे हंसिका | चतुर्थ |

**SOF आयोजित गणित व सायन्स या विषयांच्या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांचे यश खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| सायन्स | कु. धनश्री पवार | प्रथम |
| गणित | कु. रुचा काकवीपुरे | |
| | कु रुद्र घरटे | |
| | कु गार्गी कोंड | |
| इ. ६ वी | कु दीपेन पाटील | |
| | कु प्रांजल भोये | |
| | कु. कृष्णा बडे | |
| इ. ७ वी | कु. प्रीती चव्हाण | |
| | कु. संजीवनी खलाणे | |
| | कु. प्रथमेश बोटवे | |

**सी पी एस ऑलिम्पियाड फाउंडेशन**

इ. १ ली व इ. २ री च्या विद्यार्थ्यांचे 'सी पी एस ऑलिम्पियाड फाउंडेशन' तर्फे गणित, सायन्स व इंग्रजी या विषयांची परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेते खालीलप्रमाणे.

| विषय | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | पदक |
|---|---|---|---|
| इंग्रजी | कु. दिव्यांशु गायकवाड | इ. १ ली | सुवर्ण |
| | कु. अर्श गांगुर्डे | इ. २ री | सुवर्ण |
| | कु. विहान गावित | इ. २ री | रौप्य |
| गणित | कु. स्वयंम जाधव | इ १ ली | सुवर्ण |
| | कु. आराध्य वर्मा | इ २ री | सुवर्ण |
| | कु. अव्दय कोठावदे | इ २ री | रौप्य |
| | कु. आरोही कापडनीस | इ २ री | कांस्य |
| सायन्स | कु. स्वयंम जाधव | इ १ ली | सुवर्ण |
| | कु. देवांश कडाळे | इ २ री | सुवर्ण |

**वार्षिक बक्षीस वितरण समारंभ**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ दि. १४ मार्च २०२४ रोजी पार पाडला. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

**महिला दिन साजरा**

दि. १६ मार्च २०२४ रोजी महिलादिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी शाळेतील उपक्रमांची माहिती दिली. तसेच माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी शाळेतील उपक्रमांची माहिती दिली. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांसाठी विविध खेळाचे आयोजन केले होते.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !** ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगाव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**संचालक : श्री. अमोल जोशी**
**मार्च २०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

वस्तुरुप देणगी

**नाव** - **श्री. राजाराम बाळू दाते, तळेगाव (अं)**
**देणगी** - रु.५,४००/- किमतीच्या पाणी बॉटल्स
**दिनांक** - ४.३.२०२४
**निमित्त** - शालांत परीक्षा २०२४ मधील परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीत पाणी पिण्यासाठी

***

# श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**	**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

### औद्यागिक भेट

दि. ५ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयातर्फे 'मेटाफोर्ज इंजिनिअरिंग (ई) प्रा. लि.' येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली होती. सदर भेट विपणन विक्रेता, कॉस्टिंग व बँकिंग या विषयांच्या अभ्यासक्रमांतर्गत आयोजित केली होती. विविध प्रकारचे क्लीव्हिस पिन, रिवेट्स, स्टड्स, स्पेशल बोल्ट कसे बनवतात याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. कच्चा माल, दर, मोजमाप, उत्पादन, कामकाज, नफा-तोटा, विपणन आदींची माहिती श्रीमती सुनिता सोनवणे, श्री. विजय आहेर आणि श्री. गणेश यांनी दिली. नंतर विद्यार्थ्यांना कंपनीची माहिती देण्यात आली. या भेटी प्रसंगी विद्यार्थ्यांसोबत प्रतिभा रायते, श्वेता चोपडेकर आणि तृप्ती पांडे इ. उपस्थित होते.

### प्रमाणपत्र अभ्यासक्रम कार्यक्रमाचे उद्घाटन

दि. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये 'बजाज फिन्सेर्वे कंपनी'तर्फे बँकिंग, इन्शुरन्स, कौशल्य विकास या विषयासंदर्भात ९६ तासाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. दररोज ६ तास असे नियोजन या अभासक्रमासाठी करण्यात आले. या विविध विषयावर निष्णात प्रशिक्षक कंपनीतर्फे येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी बजाज फिन्सेर्वे कंपनीचे प्रमुख प्रशिक्षक श्री. विकास करणीकर यांनी विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाचे स्वरूप व महत्त्व सांगितले. तसेच श्री. आश्विन निगुडकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाविषयीच्या व्हिडिओ क्लीप दाखवून मार्गदर्शन केले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विविध विषयासंदर्भात प्रमाणपत्र मिळणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी आपल्या मनोगतामध्ये बँकिंग, इन्शुरन्स या क्षेत्रातील संधी, व महत्त्व याविषयी सांगितले. प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे या प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करण्यामागच्या हेतू विषयी सांगितले. या प्रमाणपत्र अभासक्रामाचे आयोजन वाणिज्य विभागातर्फे करण्यात आले होते.

### एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

महाविद्यालयामध्ये 'बौध्दिक संपदा हक्क' याविषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, प्रमुख पाहुणे डॉ. धीरज झालटे यांच्याहस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रमुख वक्ते डॉ. धीरज झालटे यांनी विद्यार्थ्यांना बौधिक संपदा हक्क याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनातून आजचे युग हे संशोधनाचे आणि नाविन्याचे आहे. प्रत्येक उत्पादन अधिकाधिक नवीन आणि ग्राहकाभिमुख बनविण्यावर उद्योगजगताचा भर आहे. यासाठी या विषयाचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना दिले.

वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रतिभा रायते यांनी कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. वैभवी वरखेडे हिने केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. श्वेता चोपडेकर यांनी करून दिला. आभार प्रा. तृप्ती पांडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. कोमल गांगोडे, तांत्रिक सहायक संजय चौहान, संदीप देटके आणि सचिन देव यांचे सहकार्य लाभले.

### मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना 'वाचनाचा संस्कार हा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर महत्वाचा ठरत असतो; परंतु यांत्रिकीकरणामुळे आपण भाषेपासून दूर जात असून त्यामुळे भाषिक दुष्परिणाम वाढीस लागले आहेत' असे प्रतिपादन केले. या प्रसंगी कविवर्य कुसुमाग्रजांच्या जीवनाचा पट दृकश्राव्य चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विद्या कुलकर्णी यांनी भाषेची महती, तिचे प्रवाही असणे भाषा जिवंत असण्याचे लक्षण असून प्रत्येक कालखंडात भाषिकदृष्ट्या झालेले बदल व भाषेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा व शासनाच्या भाषाविषयक धोरणाचा थोडक्यात परिचय करून दिला. कविवर्य कुसुमाग्रजांच्या कवितेतील वैविध्य त्यांच्या कवितांचे आधारे स्पष्ट करत मराठी भाषेची महती प्रतिपादन केली.

काव्यवाचन स्पर्धेत महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. खुशी बाबुल व कु. विशाल शेरे या विद्यार्थ्यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास विद्यार्थी विकास प्रमुख प्रा. सोमनाथ विघे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. अर्जुन पगारे, कला विभाग प्रमुख हेमांगिनी पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रतिभा रायते, विज्ञान विभाग प्रा. मीनल जाधव, संगणक शास्त्र प्रमुख प्रा. जयमाला सातपुते, आय. क्यू. ए. सी. प्रमुख प्रा. योगिता काकड व इतर प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तंत्रसहाय्यक म्हणून श्री. संजय चव्हाण, श्री. संदीप देटके, श्री. गणेश कुलकर्णी व श्री. सचिन देव यांनी मदत केली. महाराष्ट्र गीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

### वार्षिक स्नेहसंमेनल व पारितोषिक वितरण

दि. ७ मार्च २०२४ रोजी 'सकारात्मक विचारांच्या बळावर आयुष्यात यश संपादन करता येते, त्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध विषयांतील कौशल्ये शिकून घ्यावीत' असा प्रेरणादायी विचार कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. टी. बी. निकम, सुप्रकृती मधुशाला संचालक, नाशिक यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वार्षिक गुणगौरव समारंभात प्रतिपादन केले. परीक्षेतील यशाबरोबर मानवी जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग विद्यार्थ्यांनी शोधावा व स्वतःतील कौशल्याच्या बळावर जीवनात यशस्वी व्हावे, असेही मत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी व्यक्त केले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी अध्यक्षीय मनोगतात 'विद्यार्थ्यांनी आभासी जगात वावरण्यापेक्षा महाविद्यालयीन शैक्षणिक उपक्रमांत अधिक संख्येने सहभागी होऊन आपला विकास करावा. अपयशाने खचून न जाता सतत प्रयत्न केल्याने नक्कीच यश साध्य होते, हा मंत्र कायम विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावा' असे मार्गदर्शनपर मनोगतात आपले विचार व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांनी वर्षभरातील कार्यक्रम, कार्यशाळा व योजनांचा आढावा घेतला. महविद्यालयास नॅकचे मूल्यांकन प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थी व प्राध्यापक यांचे आभार मानत शैक्षणिक वार्षिक अहवाल सादर केला. वर्षभरातील विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे कौतुक केले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या विविध स्पर्धांत यशस्वी झालेल्या तसेच वर्षभरात कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. प्रा. धन्वंतरी देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. योगिता काकड यांनी केले. आभार स्नेहसंमेलनाचे समन्वयक प्रा. अर्जुन पगारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सोमनाथ विघे, कला विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमांगिनी पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. प्रतिभा रायते, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. मीनल जाधव संगणकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. जयमाला सातपुते व महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तांत्रिक सहाय्य श्री. संजय चौहान, श्री. संदीप देटके, श्री. गणेश कुलकर्णी, श्री. सचिन देव यांनी केले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**प्र. मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### शिवजयंती

दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात विविध विद्यार्थ्यांनी इतिहासकालीन विविध वेशभूषा करून शिवछत्रपतींच्या जीवन कार्याविषयी यथोचित भाषणे केली. शिक्षक प्रतिनिधी श्री. सुकदेव निंबेकर यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी शिवरायांच्या अंगी असलेले विविध गुण अंगीकारण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार श्री. मंथन वाळुंज यांनी मानले.

### मराठी राजभाषा दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात 'मराठी राजभाषा दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शिवाजी माळी यांच्या शुभ हस्ते कविवर्य कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी इ.६ वी अ च्या विद्यार्थिनींनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. अनेक विद्यार्थिनींनी मराठी भाषेची थोरवी सांगणारी गीते सादर केली. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी 'मराठी भाषेतील संत साहित्याचे योगदान' या विषयावर आपले विचार मांडले. उपशिक्षक श्री. सुरेश वाघमारे यांनी मराठी राजभाषा दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी मातृभाषा मराठीचे सखोल अध्ययन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले तर आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, सेवानिवृत्त प्राचार्य श्री. शिवाजी माळी, व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या शुभहस्ते नोबेल पारितोषिक विजेते सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ५ वी च्या विद्यार्थिनींनी विज्ञान गीते ७ वी अ च्या विद्यार्थिनींनी विज्ञाननिष्ठ कविता तर ९अ च्या विद्यार्थिनींनी वैज्ञानिक प्रश्नमंजुषा सादर केली. विज्ञान शिक्षक श्री लक्ष्मण चव्हाण यांनी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याचा उद्देश व महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. उपशिक्षक श्री. सुरेश वाघमारे यांनी विज्ञाननिष्ठ विचार करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञानातील विविध शोधांमुळे झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. काजल महाले व आभार प्रदर्शन कु. समीक्षा गांगोडे या विद्यार्थिनींने केले.

### लायन्स क्लब ऑफ नाशिक स्टार व गुंज फाउंडेशनकडून ५० विद्यार्थिनींना सायकली भेट

दि. २ मार्च २०२४ रोजी विद्यालयात लायन्स क्लब ऑफ नाशिक स्टार व गुंज फाउंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सायकल बँक उपक्रमांतर्गत विद्यालयातील गरजू व होतकरू ५० विद्यार्थिनींना नवीन सायकलींचे वितरण करण्यात आले यावेळी झालेल्या कार्यक्रमात लायन्स क्लब ऑफ नाशिक स्टार च्या अध्यक्षा सौ. अश्विनी बाग यांनी सायकल बँक उपक्रमाचा उद्देश सांगताना, आगामी महिला दिनाच्या

औचित्याने मुली व महिलांच्या सक्षमीकरणासाठी लायन्स क्लब ऑफ नासिक स्टार व गुंज फाउंडेशनच्या उपक्रमाची माहिती देताना मुलींनी सायकलींचा योग्य वापर करून आपली शैक्षणिक प्रगती साधावी असे आवाहन केले. यावेळी गुंज फाउंडेशनचे संदेश कोचर, टेक्नो शेल ऑटोमिनेशन प्रायव्हेट लिमिटेड चे श्री. दत्ता झांबरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात शाखा संचालक श्री. अमोल जोशी यांनी गुंज फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ नाशिक स्टार या संस्थांनी विद्यालयातील गरजू होतकरू विद्यार्थिनींना शाळेत येताना प्रवासात येणारी अडचण ओळखून त्यांना सायकली वितरित केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतानाच सर्व विद्यार्थिनी सायकलींची योग्य काळजी घेऊन आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर इतर गरजू विद्यार्थिनींना त्या हस्तांतरित करतील असे आश्वस्थ केले.

पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. सर्व मान्यवरांचा सत्कार संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. आभार श्री. चेतन गोऱ्हे यांनी मानले.

याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ नाशिक स्टारच्या सचिव श्री रत्नमाला चांडोले, झोनल चेअरमन श्री. अभय बाग परमनंट प्रोजेक्ट हेड श्री. श्रीराम डावरे, श्री. शेखर बेंद्रे, श्री. निशा भरबत, श्रीमती माधुरी खैरनार, श्री. कैलास काळे गुंज फाउंडेशनच्या सायकल प्रोजेक्ट हेड श्रीमती दिपाली गुप्ता, श्री. तरुण गुप्ता, श्री. संजय गोयल, श्रीमती करुणा गोयल, अमित शेट्टी तसेच टेक्नो सेल ऑटोमिनेशनचे श्री. संदीप चव्हाण , श्री. योगेश कापडणे, श्री. प्रफुल्ल दुसाने आदी मान्यवर उपस्थित होते.

**थोर क्रांतिकारक व योगगुरू श्री. अरविंद यात्रेची विद्यालयास भेट**

दि. १४ मार्च २०२४ रोजी विद्यालयात Auroville Foundation d Eager to Forge ahead या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या श्री अरविंद यात्रेचे आगमन झाले. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी अतिथींचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात बेजॉन देसाई फाउंडेशनचे डॉ. अश्विनी कुमार भारद्वाज यांनी श्री अरविंद यात्रेची संकल्पना व उद्देश याविषयी मार्गदर्शन केले. Eager to Forge ahead चे समन्वयक श्री. जगदीश, श्रीमती श्वेतपद्मा, श्री. देवव्रत यांनी विद्यार्थी व शिक्षकांशी योगी अरविंद व मदर यांच्या जीवन कार्याविषयी संवाद साधला. यावेळी शॉर्ट व्हिडिओ फिल्मच्या माध्यमातून योगी अरविंद यांचे जीवन कार्य समजावून सांगण्यात आले. महिला दिनाचे औचित्य साधून विद्यालयातर्फे सर्व महिला शिक्षिका व शिक्षकेतर सेविका यांचा स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन तर सर्व विद्यार्थिनींचा पेन देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. उपस्थितांचे आभार श्रीमती प्रीती राजपूत यांनी मानले.

**शिक्षक आमदार श्री. किशोर भाऊ दराडे यांची विद्यालयात सदिच्छा भेट**

दि. १८ मार्च २०२४ रोजी नाशिक विभागाचे शिक्षक आमदार श्री किशोर दराडे यांनी विद्यालयाला सदिच्छा भेट देऊन शिक्षकांशी विविध प्रश्नांबाबत संवाद साधला. तसेच आपल्या आमदार कारकिर्दीत शिक्षक शिक्षण क्षेत्राशी संबंधित सोडविलेल्या प्रश्नांची माहिती दिली. यावेळी शिक्षक सेनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष श्री. संजय चव्हाण यांनी आपले विविध प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षकांनी संघटित होऊन प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी अनेक शिक्षकांनी आपल्या समस्या मांडल्या. त्यावर श्री. दराडे यांनी समर्पक उत्तरे देऊन समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. आमदार श्री. किशोर दराडे यांचा सत्कार प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी तर श्री. संजय चव्हाण यांचा सत्कार पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी केले. आभार श्री. चेतन गोऱ्हे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक उपस्थित होते. ✲

# विद्याभवन-नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### 'संस्कार आई-बाबांचे' कात्रण स्पर्धा

दैनिक लोकमत आयोजित 'संस्कार आई-बाबांचे' कात्रण स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी बक्षिसे प्राप्त केली. या विद्यार्थ्यांना स्कूल बॅग बक्षीस म्हणून मिळाली.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. आदिती शंकर कचरे | २ री |
| कु. तन्वी दिनेश मांडवकर | २ री |
| कु. श्रीवत्स रामकृष्ण कोणार | २ री |
| कु. आर्या अशोककुमार राय | ३ री |
| कु. पूर्वी मिलिंद तांबे | ३ री |
| कु. प्रार्थना प्रवीण पाटील | ३ री |
| कु. रितिका किशोर रावते | ३ री |
| कु. स्वरा विक्रम मुळीक | ३ री |
| कु. सुमनजी दुरेंद्र ठाकूर | ३ री |
| कु. आरोही दशरथ कांबळे | २ री |
| कु. कुशल निकेश नाईकरे | २ री |
| कु. अर्णव बाळासाहेब पाटील | ३ री |
| कु. अथर्व अनिल पाटील | ३ री |
| कु. ओम सुरेश पवार | ३ री |
| कु. मुकुल बापू आहेर | ३ री |

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निबंध स्पर्धा २०२४

दि. ३ जानेवारी २०२४ व बालकल्याण समिती आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका यांच्यातर्फे विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये शिक्षिका श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक संपादित केले. **संस्थेच्या व शाळेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन!**

### उत्कृष्ट आदर्श शिक्षक पुरस्कार

महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टी असोसिएशन (MESTA) यांच्यातर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, भायखळा येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात शिक्षिका श्रीमती राखी लोणकर व श्रीमती फरहाना चौगुले यांना आदर्श शिक्षिका या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांच्या हस्ते त्यांना हे पुरस्कार प्राप्त झाले. **संस्थेच्या व शाळेच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन!**

### अबॅकस परीक्षा

युसीमस, मुंबई यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या २० व्या राज्यस्तरीय अबॅकस मेंटल अँड अरीथमॅटिक स्पर्धेमध्ये विद्यार्थी कु. प्रथमेश अमोल पाटील इ. १ ली याने F-Z२ या गटामध्ये विशेष प्राविण्य संपादित केले असून राष्ट्रीय पातळीसाठी त्याची निवड झाली आहे.

### वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन समारंभ

दि. १९ जानेवारी २०२४ रोजी विद्याभवन शाळा नेरुळ येथे प्राथमिक इंग्रजी विभागाचा पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी श्री. शिवाजी पाटील (निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त, ठाणे) व विशेष अतिथी श्री. शिवाजीराव देसाई (निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त, ठाणे) हे उपस्थित होते. संस्थेचे माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्री. धोंडीराम पिंजारी (समन्वयक), सर्व विभागांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते गणेश पूजन व सरस्वती पूजन करुन दीप प्रज्वलन करण्यात आले विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. शिक्षक श्री. संकेत थळे व श्रीमती फरहाना चौगुले यांनी पॉवर

पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध कार्यक्रमांचा अहवाल सादर केला. मुख्याध्यापिका श्रीमती मनिषा मुळीक यांनी प्रमुख अतिथी व विशेष अतिथींचा परिचय करुन दिला. अनुसंधान समिती सदस्य प्रा. कृ. ना. शिरकांडे यांच्या हस्ते श्री. शिवाजी पाटील व श्री. शिवाजीराव देसाई यांचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व पाहुण्यांच्या प्रतिमेचे रेखाटन देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी, शिक्षक तसेच सहशालेय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांची शिस्त, कार्यक्रमाचे आयोजन, संयोजकांची मेहनत ज्या संस्थांमध्ये असते, त्या संस्था नेहमी प्रगती करत असतात. त्यांचा आलेख चढता असतो. पुणे विद्यार्थी गृह या संस्थेबद्दल व संस्थेच्या गुरुवर्यांबद्दल नेहमीच आदर राहील, अशा शब्दात विशेष अतिथी श्री. शिवाजीराव देसाई यांनी संस्थेचे कौतुक केले. ही संस्था संस्कार घडवणारी आहे. इथले पालक व विद्यार्थी नशीबवान आहेत. या संस्थेतून बाहेर पडलेला विद्यार्थी आयुष्यात नक्कीच चांगला बनेल असे सांगून श्री. शिवाजी पाटील यांनी संस्थेबद्दल आदर व्यक्त केला. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देत रामायण, श्रीविष्णू अवतार, कांतारा यांच्यावर आधारित नाटिका, विविध गाण्यांवर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. संकेत थळे यांनी आभार व्यक्त केले व वंदेमातरम्‌ने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

### ७५ वा प्रजासत्ताक दिन

